# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

**Website- www.sic.maharashtra.gov.in**

दुरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार
क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र. ३०९/२०२५/जळगाव.

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री.भगवान जगन्नाथ सोनवणे,<br>रा. मु.पो.कुंझर, ता.चाळीसगाव, जि.जळगाव. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता.चाळीसगाव, जि.जळगाव. |

सुनावणी दिनांक १८/०३/२०२६

तक्रारदार यांनी दि. ०२/०७/२०२५ रोजीच्या अर्जान्वये, "व्दितीय अपील क्र.४०७६/२०२३/जळगाव संदर्भात प्रथम अपील अर्ज दाखल केल्यापासून ३० दिवसाच्या विहित मुदतीत माहिती न देणाऱ्या प्रथम अपीलिय अधिकारी याच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (८) (ग) नुसार दंड व कलम २० (२) नुसार शास्तीची कारवाई करावी. सोबतच अर्जदाराला झालेल्या आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रासापोटी अर्जदाराला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (ख) नुसार प्रत्येकी रुपये ५ लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी. व प्रत्येक अधिकाऱ्याकडून वसूल करून देण्यात यावी. व त्याची सेवा पुस्तिकेत नोंद करण्यात यावी. सोबतच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (२) आणि कलम ७(८) चे उल्लंघन व state information commission Maharashtra, reminder ३ - No.SCIC/CR.No.-६६/२०१२ Dated ८ April २०१३ नुसार माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही सार्वजनिक प्राधिकारनाणी कसूर केले तर याची गंभीर दखल घेवून कसूर करणाऱ्या अधिकाऱ्याविरूध्द भारतीय दंड संहिता १८६० कलम १६६ नुसार गुन्हा दाखल करण्याच्या सूचना Chief Information Commissioner Maharashtr यांनी दिल्या आहेत. त्यानुसार संबंधीतावर गुन्हे दाखल करण्याची शिफारस करण्यात यावी. ही गंभीर स्वरूपाची तक्रार अर्ज. तसेच In the high court of judicature at madras reserved on - ५/१२/२०२४ pronounced on २०/१२/२०२४ coram The honourable Mr. Justice C. V. Karthikeyan W. P. No-३३८५४ of २०२४ petitioners १) M. Tamilselvan २) Mrs. T. Sangeetha Vs १) The district collector chennai district chennai - ६००००१.२) The revenue divisional officer north madras ghandhi main road puzhal chennai-६०००६६ ३) Mrs. M. Jayalakshmi ४) Mr. L. Muniyandi Respondents मा. मद्रास उच्च न्यायालय यांनी section ८(j) an information which relates to personal information महत्वाचे माहिती पुरवण्याचे

आदेश दिलेले आहे. आदेश दि. २०/१२/२०२४ चे महत्वाचे आदेश देण्यात आले आहे. तसेच In the high court of punjab and haryana at chandigarh CWP-३६२२६-२०१८ date of decision-१९/२/२०२५ रोजी महत्वाचे आदेश दिले आहे. ईमेलवर व स्पीड पोस्टाने माहिती पाठवणे बंधनकारक आहे. आदेश देऊनही माहिती पुरवीत नाही त्यामुळे सामनेवाला नं १ व २ याच्यावर फौजदारी तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा. त्याच्या वर आय पी सी कलम ४२०, ४०६, १२० बी, १६६, २०१, २१७, ३४०, १६७, ४७१,४९९, १९५, ४९९, ५०१, १२४, ३४, १९९, सी आर पी सी १५४ प्रमाणे गुन्हा तात्काळ दाखल करण्यात यावा व १७३ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात यावा. व सदर गुन्हा दाखल न झाल्यास सर्व वरिष्ठ अधिकारी जबाबदार राहतील. व आपणास सह आरोपी करण्यात येईल यांची नोंद घ्यावी. जन माहिती अधिकारी श्री. संदेश पंजाबराव निकम ग्रामसेवक याच्या विरुध्द सदर अधिनियमातील कलम २० (१) अन्वये रुपये २५०००/- ची शास्तीची कारवाई होणेकरिता राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक यांनी तात्काळ आदेशीत करावे. व तसेच सेजा पुस्तकात नोंद करण्यात यावी. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी सामनेवाला नं १ व २ यांनी केलेल्या हलगर्जीपणामुळे अपिलकाराला झालेल्या मानसिक, शारिरीक व आर्थिक त्रासाबाबत अपिलकाराला सदर अधिनियमातील कलम १९ (८) (ख) अन्वये प्रत्येकी सामनेवाला नं. १ व २ रू. ५००००० (पाच लाख रुपये) ची नुकसान भरपाई मिळणेकरिता मा. मुख्य न्यायमूर्ती साहेब व मा. राज्य माहिती आयोग यांनी तात्काळ आदेश काढावे. आपल्या आदेशातील मूळ अर्जानुसार मध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलकाराला सत्य, योग्य व परिपुर्ण तसेच मुद्देनिहाय माहिती आरटीआय कलम २ (च) (दोन) नुसार प्रमाणित करून निःशुल्करित्या त्वरीत देणेबाबत तसे श्री. संदेश पंजाबराव निकम ग्रामसेवक यांना आदेशीत करणेबाबत. तक्रार दाखल करण्याच्या कालमर्यादेसंदर्भातील मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेकडील परिपत्रक क्र. 'संकीर्ण २०१८/प्र.क्र. १६४/०१: दि १०/१०/२०१३ व दि ११/२/२०१४ तसेच परिपत्रक क्र. मुमाआ-२०१५/प्र.क्र. १०९/०२; दि. ४/९/२०१५ मा. मुंबई उच्च न्यायालय यांचेकडील रिट याचिका क्र. ६०१८/२०१८ दि.३०/७/२०१९ रोजीच्या आदेशानुसार रद्द झालेले असल्यामुळे सदरच्या परिपत्रकानुसार प्रस्तुत तक्रार अग्राहय न धरणेबाबत. तसेच प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मा. महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. मुमाआ २०१९/प्र. क्र. ५०/०१, दि.२५/६/२०१९ नुसार मला अपेक्षित माहिती पुरविण्यासाठी विशेष प्रयत्न केलेले दिसून येत नाही. अथवा जन माहिती अधिकारी यांनी अपिलकाराला माहिती पुरवित आहे किंवा नाही, याकडेही लक्ष ठेवलेले दिसून येत नाही. यावरून असे स्पष्ट होते कि, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आपल्या विहित कर्तव्यपालनात जाणूनबुजून प्रचंड कसूर व टाळाटाळ केलेली आहे. तक्रारदार विहित मुदतीत कोणतीही माहिती न दिल्यामुळे कलम ७ (१) चा भंग केला असे निदर्शनास येत असल्याने त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) (२) नुसार शास्तीची कारवाई कायम करण्यात यावी. राज्य माहिती आयोगाने सार्वजनिक प्राधिकरणांना दिलेले निर्देश, तक्रारी व द्वितिय अपीलांवरील निर्णय इ. चे योग्य रितीने अनुपालन विहित कालावधीत करून आयोगाच्या निर्देशाप्रमाणे त्याचा अनुपालन अहवाल आयोगाने विहित केलेल्या कालावधीत आयोगास सादर करणे सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/६८८/प्र. क्र.२१९/०८/६ (मा.अ.); दि.१०/६/२००८ तसेच शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१४/प्र.क्र. (२४०/१४) सहा: दि.१३/२/२०१५ नुसार अनिवार्य आहे. तसेच अशा प्रकरणी कर्तव्यच्युती

करणाऱ्याविरूद्ध संबंधित सक्षम प्राधिका-याने उचित विभागीय कार्यवाही करावी असे देखील सदर शासन परिपत्रकामध्ये नमूद केलेले आहे. प्रस्तूत प्रकरणी आपल्या आदेशाचे अनुपालन न झाल्यामुळे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस पूर्णपणे पात्र आहेत. याद्वारे आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते कि, तक्रार दाखल करण्याच्या कालमर्यादेसंदर्भातील मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. 'संकीर्ण २०१८/प्र.क्र. १६४/०१: दि १०/१०/२०१३ व दि.११/२/२०१४ तसेच परिपत्रक क्र. मुमाआ-२०१५/प्र.क्र. १०९/०२: दि.४/९/२०१५ मा. मुंबई उच्च न्यायालय यांचेकडील रिट याचिका क्र.६०१८/२०१८: दि.३०/७/२०१९ नुसारच्या आदेशानुसार रद्द झालेले आहे. त्यामुळे सदरच्या परिपत्रकानुसार प्रस्तुत तक्रार अग्राहय धरता येणार नाही, याची कृपया आपण नोंद घ्यावी. तरी उपरोक्त विषयांन्वये कार्यवाही होणेस प्रार्थना आहे. येणे प्रमाणे तक्रार आहे." असे तक्रारदार यांनी नमूद करुन माहितीचा अधिकार अधिनियमांतील कलम १८ (१) अंतर्गत आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

२) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि. १८/०३/२०२६ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी सर्व पक्षकार अनुपस्थित होते.

३) तक्रारदार यांनी त्यांच्या दि. १०/१२/२०२२ रोजीच्या मुळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

*"१५ व्या वित्त आयोगाचे झालेल्या कामाचा तपशिल, ग्रामपंचायतचे वार्षिक (१५ व्या वित्त आयोगाचे एकुण रक्कम जमा किती) किर्द खतावणीचा कालावधीत एस. सी. एस. टी. वर ग्रामपंचायतने केल्याला खर्च व शिल्लक रक्कम, बँक पासबुक सह व GST बिले व त्याच्यानावे दिलेली चेकचा तपशिल मिळावी."*

४) आयोगाने व्दितीय अपील क्र. ४०७६/२०२३/जळगाव संदर्भात दि.११/१२/२०२४ रोजी आयोगासमोर झालेल्या सुनावणीअंती दि.११/०६/२०२५ अन्वये खालील प्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

*"विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १०/१२/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्यं पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे."*

५) सुनावणी दरम्यान सादर केलेला युक्तीवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, द्वितीय अपिल क्रमांक-४०७६/२०२३/जळगाव संदर्भात आयोगाने दि.११/०६/२०२५ अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. प्रत्यक्ष सुनावणीवेळी विद्यमान/तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित असून सुनावणीपूर्वी तत्कालीन /विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणी कोणताही अहवाल आयोगास सादर केल्याचे दिसून येत नाही. यावरून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,

कुंझर, ता. चाळीसगांव यांनी तक्रारदार यांना माहिती देण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येते.

७. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या खालील नमुद आदेशाप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत तक्रारीमध्ये थेट माहिती देण्याचे आदेश पारीत करता येत नाही.

In the case of Chief Information Commissioner -Vs- State of Manipur (AIR २०१२ SC ८६४), the Hon'ble Supreme Court has observed that a complaint under Section १८ of the Right to Information Act, २००५, could not be treated as appeal under Section १९ and, therefore Information Commissioner while entertaining a complaint under Section १८ of the said Act has no jurisdication to pass an order providing for access to information.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त आदेशानुसार तक्रारीत थेट माहिती देण्याचे आदेश पारीत होत नाही. त्यामुळे तक्रारकर्ता यांनी तक्रारअर्जान्वये केलेली माहिती देण्याची विनंती मान्य करता येत नाही.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग पूढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता. चाळीसगांव, जि. जळगांव, यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत द्वितीय अपिल क्रमांक-४०७६/२०२३/जळगाव संदर्भात आयोगाने दिनांक ११/०६/२०२५ अन्वये पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२. द्वितीय अपिल सुनावणीवेळी कार्यरत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता.चाळीसगाव, जि. जळगांव (दि.११/१२/२०२४ रोजी कार्यरत) यांनी द्वितीय अपिल क्र. ४०७६/२०२३/जळगाव संदर्भात आयोगाने दिनांक ११/०६/२०२५ अन्वये पारित केलेल्या आदेशास अनुसरुन माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या १५ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३. वरील निर्देशांसह प्रस्तुत तक्रार क्र. ३०९/२०२५/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

---

जा.क्र. 3919    05/05/2026.

---